


REGISTERED No. B. 3434

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १६ पुणें, बुधवार तारीख २२ मार्च, १९५० अंक १२



## दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि०,

पुणें २.

**नवीन हंगामाची २८,००० पोतीं साखर तयार झाली.**

---

**नवीन आठ लक्ष पंचाहत्तर हजार रुपयांचे शेअर खपले आहेत.**

---

**पुढील हंगामाकरितां २००० एकर ऊंस लावला आहे.**

---

**मशिनरीच्या उभारणीला सुरवात.**

नवीन मशिनरीनें दरसाल १,२०,००० पोतीं साखर तयार करतां येईल.

---

## शेअर विक्री सुरूं आहे.

प्रत्येक शेअरची किंमत ... ... ...रु. २५
शेअर–अर्जासोबत ... ... ... ...रु. १०
ता. १–१०–१९५० ला कॉलचे... ...रु. १५

प्रत्येकीं चाळीस शेअर घेणारे पांच हजार महाराष्ट्रीय सहकार्य करतील, तसेंच साखर विक्रीवर नियंत्रण असेपर्यंत मोठ्यांत मोठ्या रकमा डिपॉझिट म्हणून देतील असा अनुभव आहे व त्याप्रमाणें शेअर व डिपॉझिटस येत आहेत.

---

## मुदतीच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

एक वर्ष मुदत...द. द. शें. ५ टक्के व्याज
दोन वर्षें मुदत...द. द. शें. ५॥ टक्के व्याज.
तीन वर्षें मुदत...द. द. शें. ६ टक्के व्याज.

व्याज दर सहा महिन्यांनीं दिलें जातें.

---

१० मार्च १९५०.
९८०, सदाशिव पेठ,
कॉमनवेल्थ बिल्डिंग,
लक्ष्मी रोड, पुणें २.

चंद्रशेखर गोविंद आगाशे,
बी. ए., एलएल. बी.
सी. जी. आगाशे ॲण्ड को.,
मॅनेजिंग एजंटस.

# पांच हॉर्स पावरचें डिझेल एंजीन

घ्यावयाचें म्हणजे तें किर्लोस्कर पीटरच ! संपूर्ण पंपिंग सेटही मिळेल. चौकशी करा.

केळकर बंधू, बुधवार चौक, पुणें शहर.


## विविध माहिती

**पाण्याच्या पुरवठ्यांत विचित्र अडथळा**—उत्तर जर्मनी मधील एका गांवीं पाण्याच्या नळांतून नीट पाणी येईनासें झालें. पाण्याचें पृथःकरण करतां, त्यांत प्लॅस्टर ऑफ पॅरीसचे बारिक कण आढळून आले. त्यानंतर पाण्याच्या टाक्यांची तपासणी केली, त्यांत हिटलरचे अर्धपुतळे टाकून दिल्याचें आढळलें ! पाणबुड्यांकडून हे-पुतळे काढून टाकण्यांत आल्यावर पाणीपुरवठा नीट होऊं लागला.

**लॉर्ड बॉईड ऑर ह्यांचा इषारा**—लॉर्ड बॉइड ऑर ह्यांचें सायंटिफिक वर्कर्स असोसिएशनपुढें एक महत्त्वाचें भाषण नुकतेंच झालें. "क्रांतिकारक कम्युनिझमचें तत्वज्ञान आशियांतून आफ्रिकेंत, मध्यपूर्वेंत आणि द. अमेरिकेंत पसरण्याचा संभव आहे. भूक हा सर्वांत मोठा राजकीय शिक्षक आहे. जें सरकार अगर जी अर्थव्यवस्था लोकांना आयुष्याच्या प्राथमिक गरजा पुरवूं शकत नाहीं असें सरकार अगर अर्थव्यवस्था लोक उलथून पाडल्याशिवाय रहाणार नाहींत" असा इषारा त्यांनीं दिला.

**भारतामधील टेलिफोन्सचें उत्पादन**—१९४८–४९ सालीं भारताच्या पोस्ट आणि टेलिग्राफ खात्यानें १०,९१४ टेलिफोन्स आयात केले. १९४९–५० सालीं मात्र फक्त ४०० टेलिफोन्स आयात करण्यांत आले, आणि त्यापेक्षा अधिक लागणारे टेलिफोन्स बंगलोर येथील कारखान्यांत तयार करण्यांत आले. १९४९–५० सालीं ह्या कारखान्यांत १७,१२५ टेलिफोन्स तयार करण्यांत आले.

**बँक ऑफ भोपाळ लि. चा नफा**—ह्या बँकेला १९४९ सालीं ४५,८७८ रुपयांचा निवळ नफा झाला. मागील वर्षाच्या नफ्याशीं तुलना करता नफ्यांत ५० टक्के घट झालेली दिसून येते. बँकेजवळील ठेवींतही १९४९ सालीं घट झाली. १९४८ सालीं बँकेजवळ १·३५ कोटी रुपयांच्या ठेवी होत्या. त्या १९४९ सालीं ४८ लाख रुपयांवर आल्या. कराची शाखेचा १८,३१९ रुपयांचा नफा भारताकडे जमा करण्यांत आला नाहीं. वसूल करण्यास कठीण अशा कर्जांसाठी तो राखून ठेवण्यांत आला.

**इजिप्तसाठी रशिअन गहू**—रशिआनें इजिप्तला १,००,००० टन गहू पुरवावा म्हणून वाटाघाटी चालूं आहेत. १९४८ सालीं रशियानें गहू पुरविला होता त्यावेळीं गव्हाच्या बदला कापूस घेतला होता. ह्या खेपेला रशिया रोख किंमत घेणार का ऐनजिनसी देवघेव करणार हें समजलें नाहीं.

**ठाणा इलेक्ट्रिक सप्लाय कंपनी**—ठाणा डिस्ट्रिक्ट करंट इलेक्ट्रिक सप्लाय कं. लि. ह्या कंपनीला मुंबई सरकारनें मूळच्या ठरलेल्या योजनेप्रमाणें वीजपुरवठा करण्याचा परवाना द्यावा अशी विनंति कंपनीतर्फें करण्यांत आली आहे. टाटा कंपनीकडून मोठ्या प्रमाणावर वीज विकत घेऊन ती पुरविण्याची ह्या कंपनीची योजना होती. तथापि टाटा कंपनीकडून वीज मिळण्याची शक्यता फारशी नसल्याचें कारण दाखवून कंपनीनें स्वतःच वीज उत्पन्न करावी असें आतां सरकारचें म्हणणें आहे. टाटा कंपनी १९५२ सालीं कंपनीला वीज पुरवूं शकेल असें ठाणा कंपनीला कळविण्यांत आलें आहे.

**चिनी आणि रशिअन जातीचा तांदूळ**—काश्मीरमध्यें १९४१ सालापासून चिनी जातीचे भात लावण्याचे प्रयोग करण्यांत येत होते. हे प्रयोग आतां यशस्वी झाले असून काश्मीरच्या शेतकऱ्यांना हें भात मान्य झालें आहे. ह्या भाताचें दर एकरीं पीक ५,००० ते ६,००० पौंड निघूं शकतें. हिंदी भाताचें पीक अवघें ८५० पौंड निघूं शकतें. हिमाचल प्रदेश आणि उत्तर प्रदेश ह्या प्रांतांतही हें भात येऊं शकेल. ७,००० ते ९,००० फूट उंचीच्या प्रदेशांत रशिअन जातीचें भात लावण्याचे प्रयोगही चालू आहेत.

**मुंबई प्रांतांतील धान्याचें उत्पादन**—मुंबई प्रांतांत अधिक धान्य पिकविण्याच्या मोहिमेंत १९४६–४७ सालीं ६६,००० टन, १९४७–४८ सालीं ६५,००० टन आणि १९४८–४९ सालीं १,२५,००० टन अधिक धान्य उत्पन्न झालें. मुंबई प्रांतांत मासे बाजारांत आणणाऱ्या ४६ सहकारी संस्था आहेत.

**अडचणींत सांपडलेल्या बँका**—१९४९ सालीं भारतांतील २३ बँकांना पैसे देण्याचें बंद करावें लागलें अशी माहिती भारत सरकारच्या फडणिसांनीं सांगितली. त्यांच्या मतानें ह्या बँका अडचणींत येण्यास पुढील कारणें झालीं:—पैशाची अयोग्य गुंतवणूक, वाजवीपेक्षां अधिक शाखा काढणें आणि ठेवी मिळविण्यासाठी वाजवीपेक्षां अधिक व्याज देणें.

**ओरिएंटल विमा कंपनीचें नवें काम**—ह्या आयुर्विमा कंपनीनें १९,४८,७६,१५१ रुपयांचें नवीन काम पूर्ण केलें. १९४८ सालीं पूर्ण झालेल्या कामापेक्षां हें काम ९० लाख रुपयांनीं अधिक असलें तरी १९४७ मधील पूर्ण कामापेक्षां ५४,५७,००० रुपयांनीं कमी आहे.

**कलकत्त्यांतील बँकांचें एकत्रीकरण**—रिझर्व्ह बँकेच्या सल्ल्याप्रमाणें कलकत्त्यांतील चार बँकांचें एकत्रीकरण करून जी नवी बँक काढण्यांत येणार आहे तिचें नांव युनायटेड बँक ऑफ इंडिआ असें राहील. बेंगाल सेंट्रल बँक, कोमिल्ला बँकिंग कॉर्पोरेशन, कोमिल्ला यूनिअन बँक आणि हुगळी बँक ह्या चार बँकांनीं अडचणींत सांपडल्यामुळें रिझर्व्ह बँकेच्या शिफारसीप्रमाणें एकत्र व्हावयाचें ठरविलें आहे.

**इंडोचायनामधील युद्धाचा खर्च**—इंडोचायनांतील राष्ट्रीय सरकार विरुद्ध फ्रान्सनें चालविलेल्या युद्धांत फ्रान्सला १९४९ सालीं ४७,५०,००,००० डॉलर्स खर्च आला. फ्रान्सला मार्शल योजनेप्रमाणें मिळणाऱ्या अमेरिकन मदतींतून हा खर्च करण्यांत आल्यामुळें फ्रान्सच्या पुनर्घटनेला तेवढा पैसा कमी पडला.


—सर्व प्रांतांतील—
सुती–गरम–रेशमी
—खादीचें माहेरघर—
खादी मन्दिर
२६२, बुधवार पेठ
ढमढेरे बोळाजवळ,
पुणें २.

# अर्थ

बुधवार, ता. २२ मार्च, १९५०





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## नव्या कारखान्यांची उभारणी

### परदेशी फर्म्सचें सहकार्य

भारतांतील ३५ कोटी लोकसंख्येच्या ऐहिक समृद्धीसाठींच केवळ नव्हे, तर नुसतें जगण्यासाठीं सुद्धां औद्योगिक व शेतीच्या उत्पादनांत वाढ करणें आवश्यक झालें आहे. भारत सरकारनें आपलें उद्योगविषयक धोरण ६ एप्रिल, १९४८ ला जाहीर केलें. तेव्हांपासून निरनिराळ्या उद्योग धंद्यासंबंधीं सरकारनें बरेच तांत्रिक अहवाल तयार केले आहेत. अशा प्रकारची तांत्रिक सल्लामसलत घेतांना अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स, स्वित्झरलंड, स्वीडन, जर्मनी, इत्यादी अनेक देशांतील कुशल तज्ज्ञांच्या अनुभवाचा फायदा सरकारला मिळाला आहे.

भारताच्या औद्योगीकरणांत पोलादाच्या कारखान्यांना अर्थातच पहिलें स्थान आहे. सध्या पोलादाचें शक्य उत्पादन १२,५०,००० टन आहे. तथापि प्रत्यक्ष उत्पादन मात्र ९,००,००० टनाच्या जवळपास होतें. हें वार्षिक उत्पादन १० लाख टनांनीं वाढविण्याचा सरकारचा विचार आहे. ह्या कामांत कॉपर्स कंपनी, व ऑर्थर जी. मॅकी कंपनी ह्या अमेरिकन कारखान्यांचें आणि इंटरनॅशनल कन्स्ट्रक्शन कं. ह्या इंग्लंडमधील कारखान्यांचें साह्य घेण्याचें सरकारनें ठरविलें आहे. १० लाख टन पोलाद उत्पन्न करणारा एक कारखाना अगर ५ लाख टन उत्पादन करणारे दोन कारखाने ह्या पैकीं कोणची योजना स्वीकारार्ह आहे, ह्यासंबंधीं वरील कंपन्यांनीं सल्ला द्यावयाचा होता. ह्या शिवाय स्टील कॉर्पोरेशन ऑफ बंगाल ह्या कारखान्याला सरकारनें ५ कोटी रुपये कर्ज धंद्याच्या विस्तारासाठीं दिलें आहे. विस्ताराच्या योजनेचा पहिला भाग पूर्ण झाला म्हणजे ह्या कारखान्याचें वार्षिक उत्पादन ४,५०,००० टनापर्यंत होईल.

यांत्रिक हत्यारें तयार करण्याचा एक कारखाना म्हैसूर येथें काढण्यांत येणार आहे. ह्या कारखान्यासाठीं स्विस ओर्लिकॉन कं. शीं करार करण्यांत आला आहे. कारखान्याला १२ कोटी रुपये भांडवल लागेल व दर वर्षी ७ ते ८ कोटी रुपयांची यांत्रिक हत्यारें तयार होतील. स्विस कंपनी १० टक्के भांडवल गुंतविणार असून ह्या भांडवलावर कांहीं अटी घालून ५ टक्के व्याज पहिलीं पांच वर्षें देण्याचें सरकारनें कबूल केलें आहे.

१९५१ ते १९५५ ह्या काळांत भारताला १५,००,००० किलोवॅट विजेच्या निर्मितीची नवीं यंत्रें लागतील. वीज उत्पन्न करण्याची यंत्रसामुग्री जवळ जवळ ५० कोटी रुपये भांडवल लागेल. दर वर्षी ३,००,००० किलोवॅट वीज उत्पन्न करूं शकणाऱ्या कारखान्याची यंत्रसामुग्री निर्माण करणारा एक कारखाना उभारण्याचा भारत सरकारचा विचार आहे. ह्या कामासाठीं इंग्लंडमधील असोशिएटेड इलेक्ट्रिकल इंडस्ट्रीज आणि अमेरिकेंतील इंटरनॅशनल जनरल इलेक्ट्रिक ह्या कंपन्यांची मदत सरकार घेणार आहे.

रेडिओ तयार करणाऱ्या ४ कंपन्या सध्या भारतांत आहेत. त्यांचें वार्षिक उत्पादन सुमारें २५,००० सेट्स आहे. एक फ्रेंच आणि एक इंग्लिश कंपनी ह्यांच्या मदतीनें, सरकारी मालकीचा रेडिओचा कारखाना काढण्याचा विचार चालू आहे. ह्या कारखान्याला ३ कोटी रुपये भांडवल लागेल.

जमिनींत पुरण्याच्या टेलिफोनच्या तारा तयार करण्यासाठीं ब्रिटिश स्टँडर्ड टेलिफोन्स अँड केबल्स कंपनीशीं सरकारनें करार केला आहे. हा कारखाना बंगाल्यांत चित्तरंजन येथें उभारण्यांत येणार आहे. भांडवल १ कोटी रुपये लागेल. सध्या दरवर्षी सरासरी ७० लाख रुपयांच्या तारा आयात करण्यांत येतात.

ब्रिटनमधील लोकोमोटिव्ह मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनच्या साह्यानें बंगालमध्यें चित्तरंजन येथें रेल्वे एंजिनांचा कारखाना काढण्याचें घाटत आहे. ह्या कारखान्यांत दर वर्षी १२० एंजिनें आणि ५० बॉयलर्स तयार होतील. ह्या कारखान्यांत प्रारंभीं रेल्वेच्या एंजिनांचे सुटे भाग तयार करण्यांत येणार आहेत. भारतांत दर वर्षी १,२०० डिझेल एंजिन्स तयार होण्याची शक्यता आहे. किर्लोस्कर ऑईल एंजिन्स या नुकत्याच उभारल्या गेलेल्या कारखान्यामुळें दर वर्षी ४,५०० डिझेल एंजिन्स तयार होऊं लागतील.

येत्या पांच ते सात वर्षांत २० लाख टनाच्या बोटी बांधण्याचा सरकारचा विचार आहे. परंतु ह्या योजनेंत मोठ्या अडचणी आहेत. भारतांत बोटी बांधणें परदेशांच्या मानानें महाग पडतें. शिवाय भारताच्या किनाऱ्यावरील दर्यावर्दी व्यापार भारतीय कंपन्याच्यांच हातांत रहावा ह्या आग्रहाला परदेशी पी. अँड ओ. सारख्या कंपन्या प्रतिकूल आहेत. त्या मॅनेजिंग एजन्सी आपल्याकडे घेतल्याशिवाय तांत्रिक साह्य करण्यास तयार नाहींत.

हिंदुस्थान एअर क्रॅफ्ट लि. ही कंपनी भारत सरकार आणि म्हैसूर सरकार ह्यांच्या संयुक्त मालकीची आहे. भारताच्या लष्करी आणि नागरी विमानांची दुरुस्ती हीच कंपनी करते. पर्सीव्हिल एअर क्रॅफ्ट कं. लि. च्या साह्यानें शिक्षणासाठी लागणारीं विमानें ही कंपनी तयार करणार आहे. डीहॅविलँड एअरक्रॅफ्ट कंपनीच्या मदतीनें कारखान्याचा विस्तार करण्याच्या वाटाघाटी सध्या चालू आहेत.

मद्रास येथें आणखी एक मोटारीचा कारखाना काढण्याची परवानगी मध्यवर्ती सरकारनें दिली आहे. ह्या कारखान्यांत दर वर्षी २,००० मोटारी जुळविण्यांत येतील. एन्नोर येथील मोटारींचा कारखाना उभारण्याचें काम संपत आलें आहे. ह्या कारखान्यांत दर वर्षी ५,००० मोटारी जुळविण्यांत येतील. भारताला लागणाऱ्या ट्रॅक्टर्ससंबंधीं मेसर्स मार्शल सन्स अँड को. लि. ही कंपनी प्राथमिक माहिती गोळा करीत आहे. ट्रॅक्टर्सचा कारखाना काढणें शक्य आहे असें वाटल्यास मध्यम आकाराचे ट्रॅक्टर्स तयार करण्याचा कारखाना कंपनी काढील.

तीन ब्रिटिश कंपन्यांच्या सहकार्यानें सायकलींचे कारखानेही काढण्यांत येणार आहेत. ब्रिटनमधील बी. एस. ए. कंपनी मद्रास

सरकारच्या आश्रयानें कारखाना काढण्याचा विचार करीत आहे. रॅले आणि ट्यूब इनव्हेस्टमेंटस लि. ह्या कंपन्या कलकत्ता आणि मद्रास येथील देशी सायकलींच्या कंपन्यांशीं सहकार्य करणार आहेत. प्रत्येक कारखान्यांत दर वर्षी १,००,००० सायकली तयार होतील. सध्या भारतांत दर वर्षी ७०,००० सायकली तयार होतात. परंतु गरज मात्र ५,००,००० सायकलींची आहे.

बिहारमधील सिंद्री येथें रासायनिक खतांचा एक कारखाना उभारण्याचें सरकारनें ठरविलें आहे. ह्या कारखान्यांत दरवर्षी ३,५०,००० टन अमोनिअम सल्फेट तयार होईल. कारखाना उभारण्याचे कामीं केमिकल कन्स्ट्रक्शन कॉर्पोरेशन आणि पॉवर गॅस कॉर्पोरेशन ह्या अमेरिकन आणि ब्रिटिश कंपन्यांचें साह्य घेण्यांत येत आहे. कारखान्याला १६ कोटी रुपये भांडवल लागेल. म्हैसूर सरकारनें भद्रावतीला खताचा कारखाना काढण्याचे ठरविलें आहे. ह्या कारखान्याला केमिकल कन्स्ट्रक्शन कॉर्पोरेशन ह्या अमेरिकन कारखान्याची मदत होईल. कारखान्याला २॥ कोटी रुपये भांडवल लागेल आणि त्यांत दर वर्षी ५०,००० टन खत तयार होईल.

पुण्याजवळ स्विडिश तज्ज्ञांच्या सल्ल्यानें, पेनिसिलिन, सल्फा ड्रग्ज आणि मलेरिआवरील औषधें तयार करण्याचा कारखाना उभारण्यांत येत आहे. कारखान्याला भांडवल ४ कोटी रुपये लागेल. १९५२ सालीं प्रत्यक्ष उत्पादनाला प्रारंभ होईल.

संयुक्त प्रांत सरकार मिर्झापूरला एक सिमेंटचा कारखाना काढीत आहे. कारखान्याला १½ कोटी रु. भांडवल लागेल. लंडनमधील व्हिकर्स आर्मस्ट्रॉंगज आणि ब्रश इलेक्ट्रिक एंजिनिअरिंग कंपनी ह्या कंपन्यांचें सहकार्य घेण्यांत आलें आहे.

दिल्ली येथें भारत सरकारच्या वतीनें 'तयार घरें' निर्माण करणारा एक कारखाना उभारण्यांत आला आहे. इंग्लंडमधील स्ट्रक्चरल अँड मेकॅनिकल डेव्हलपमेंट लि. ह्या कंपनीचे सहकार्यानें दर वर्षी ५,५०० फ्लॅटचीं घरें बांधण्यांत येणार आहेत. असे आणखीही कारखाने निघणार आहेत.

कोळशा पासून दर वर्षी १० लाख टन पेट्रोल उत्पन्न करणारा एक कारखाना उभारण्याचा सरकारचा विचार होता. परंतु भांडवलाच्या टंचाईमुळें फक्त १,००,००० टन निर्माण करण्याचे आतां ठरविण्यांत आलें आहे. ह्या कृत्रिम पेट्रोल पैकीं ७६,००० टन पेट्रोल विमानांना लागणारें तयार करण्यांत येईल. कारखाना उभारण्यासाठीं डॉ. ग्रिनम ह्या जर्मन तज्ज्ञाचें सहकार्य सरकारला मिळालें आहे.

**रिझर्व्ह बँकेच्या कायद्यांत दुरुस्ती**—रिझर्व्ह बँकेच्या कायद्यांत दुरुस्ती करण्यांत येणार आहे असें समजतें. बँकेच्या मध्यवर्ती बोर्डावरील डायरेक्टर्स नेमण्याचा अगर काढण्याचा अधिकार सरकारला आहे. परंतु, प्रादेशिक डायरेक्टर्ससंबंधीं तसा अधिकार नाहीं. हा अधिकार सरकार घेणार आहे. त्याच प्रमाणें, सहकारी संस्थांतर्फे शेतकीसाठी देण्यांत येणाऱ्या कर्जाची मुदतही ९ महिन्याऐवजीं १२ महिन्यापर्यंत वाढविण्यांत येणार आहे. शेड्यूल्ड बँकांनीं गुंतविलेल्या रकमा आणि त्यांचे इतर बँकांकडे असलेले पैसे ह्याबद्दल माहिती मागण्याचा अधिकारही रिझर्व्ह बँक आपणाकडे घेणार आहे.

**परदेशीं जाण्यासाठी डॉलर्स**—१९४८ सालीं विद्यार्थी, व्यापारी आणि इतर प्रवासी ह्यांना ४१,२४,७८१ डॉलर्स परदेशांतील प्रवासासाठी भारत सरकारनें मंजूर केले होते. १९४९ सालीं ४०,१६,४३७ एवढेच डॉलर्स मोकळे करण्यांत आले.

## दी बँक ऑफ औंध लि.

### १२ व्या वार्षिक सभेचा वृत्तांत

दी बँक ऑफ औंध लि. ची १२ वी वार्षिक सभा तारीख ५–३–१९५० रोजीं रविवारीं दुपारीं ४ वाजतां बँकेचें हेड ऑफीस, सातारा, सदाशिव पेठ, १११–११२ येथें बँकेचे चेअरमन श्री. नरहर गंगाधर उर्फ नानासाहेब जोशी, बी. ए. एलएल्. बी. यांचे अध्यक्षतेखालीं झाली.

प्रारंभीं बँकेचे मॅनेजर श्री. बा. वा. घमंडे यांनीं सभेची नोटीस वाचून दाखविली. नंतर मागील वार्षिक साधारण सभेचें प्रोसिडिंग वाचून दाखविलें व तें सर्वानुमतें कायम करणेंत आलें. तसेंच ता. ३१–१२–१९४९ अखेरचा ऑडिट रिपोर्ट वाचून दाखविला व नंतर अध्यक्ष यांचें भाषण झालें. अध्यक्ष यांनीं आपले भाषणांत हल्लीचे आर्थिक परिस्थितीचा आढावा घेतला व त्या योगें मोठ्या अगर लहान बँकेवर सदर आर्थिक परिस्थितीचा परिणाम कसा होतो याचें विवरण केलें. तसेंच लहान बँका व मोठ्या बँकांचें कार्यक्षेत्र यांतील फरक दाखवून लहान बँकांचें अस्तित्व कां जरूर आहे हें सांगितलें. नंतर संस्थानें मुंबई प्रांतांत विलीन झालेमुळें दक्षिणी संस्थानांतील सर्वच बँकांवर सदर विलीनीकरणाचा कसा परिणाम झाला, व तोच विशिष्ट परिणाम आपले बँकेवर कसा झाला याचें विवेचन केलें व त्यांतून मार्ग काढणेंकरतां या बाबत सदरहू बँकांनीं काय व्यवस्था केली आहे व सरकारनें काय मदत केली पाहिजे याची माहिती दिली. तसेंच चालू वर्षी भारत सरकारनें इनकमटॅक्स बाबत केलेल्या फरकानें बँकेचा कसा फायदा होत आहे हेंही सांगितलें. गेले वर्षी बँकेस आलेल्या अडचणींतून बोर्डानें अत्यंत दक्षता घेऊन मार्ग काढिला. शेवटीं सर्व भागीदार, ठेवीदार व व्यापारी वर्ग यांना बँकेस असाच हार्दिक पाठिंबा देणेंबद्दल विनंति करून त्यांनीं आपलें भाषण संपविलें.

नंतर कै. श्री. श्रीपाद प्रभाकर ऊर्फ आत्मारामपंत ओगले यांचे अकाली निधनाबद्दल दुखवटा ठराव श्री. चेअरमन यांनीं मांडला. तो सर्वांनीं उभे राहून पास केला. ता. ३१–१२–१९४९ अखेरचा ताळेबंद व नफातोटा पत्रक मंजूर करणेंत आलें. पुढील सालाकरतां मे. पी. जी. भागवत, चार्टर्ड अकाउंटंट, मुंबई यांची ऑडिटर म्हणून निवड करणेंत आली. पुढील सालाकरतां ( १ ) श्री. नरहर गंगाधर जोशी, ( २ ) श्री. वा. ग. चांदोरकर, ( ३ ) श्री. शेठ कालिदास भाईचंद, ( ४ ) श्री. रघुनाथ दिनकर माजगांवकर, ( ५ ) श्री. बाळकृष्ण रामचंद्र वर्तक असे डायरेक्टर्स निवडून आले. नंतर बँकेचे मॅनेजिंग डायरेक्टर, श्री. बाळकृष्ण रामचंद्र वर्तक हे बँकेचे नोकरींतून ता. १–१–१९५० पासून सेवानिवृत्त झाले; त्यांनीं सदर बँकेचा व्यवहार कौशल्यानें करून अनेक अडचणींतून मार्ग काढून बँकेस उर्जितावस्था आणून दिली याबद्दल त्यांचें हार्दिक अभिनंदन करणारा ठराव श्री. मनोहरपंत भागवत यांनीं मांडला व तो सर्वांनीं टाळ्यांच्या गजरांत पास केला.

शेवटीं आभार प्रदर्शन होऊन सभेचें काम संपलें.

**साखरेच्या धंद्याचें संरक्षण**—टॅरीफ बोर्डाच्या शिफारसीप्रमाणें ३१ मार्च १९५० पासून साखरेच्या धंद्याची संरक्षक जकात रद्द करण्यांत येऊन त्याऐवजीं आयातीवर रेव्हेन्यू ड्यूटी बसविण्यांत येणार आहे. ही ड्यूटी बसविल्यानें साखरेचें योग्य उत्पादन आणि वाटणी ह्यांना मदत होईल असा अंदाज आहे.

## कंपनी कायदा व आगामी सुधारणा

### डायरेक्टर्सबाबत

ले.:- "आशावादी"

लिमिटेड कंपन्यांच्या कारभारामध्यें प्रत्येक शेअर होल्डरला भाग घेतां येणार नाहीं. म्हणून एजन्टस् व डायरेक्टर्स निवडून त्यांचे हातीं दैनंदिन कारभार दिलेला असतो. वास्तविक कंपनी काढणारे अगोदरच, कोणकोण डायरेक्टर असावेत व त्यांचे अधिकार व त्यांचे एजन्टशीं संबंध कसे असावेत वगैरे ठरवून ठेवतात. त्यांत फेरबदल करणें शेअर होल्डर्सना अशक्यच असतें. तथापि कंपनी कायद्याप्रमाणें डायरेक्टर्सवर असलेल्या बंधनांत वाढ करणें अगत्याचें वाटून सरकारी पत्रकांत २३ सूचना मांडण्यांत आल्या आहेत.

मुख्यतः एजन्टस, मॅनेजिंग डायरेक्टर किंवा मॅनेजर हे कंपनीचा कारभार व्यवस्थित व कंपनीच्या फायद्याचा असा करतातना, हें पाहणें डायरेक्टरांचें कर्तव्य. सध्याचे कायद्याप्रमाणें डायरेक्टरांचे वर पुष्कळ निर्बंध आहेत. नवीन सूचनांप्रमाणें ( या २३ आहेत व आपल्या ता. १६-३-५० चे "अर्थ" मध्यें त्या सविस्तर छापल्या आहेत. ) डायरेक्टरांना पुष्कळ जबाबदारी घ्यावी लागेल व जाब द्यावे लागतील. तथापि मुख्य एक मुद्दा-यांतून पळवाटा निघतील का ? निघतील. त्यासाठीं खालील थोड्या सूचना कायद्यांतच समाविष्ट केल्या, तर कंपन्यांचे कारभारावरील डायरेक्टरांची देखरेख जास्त परिणामकारक होईल व त्याचा फायदा शेअरहोल्डर्सना मिळेल अशी अपेक्षा.

**डायरेक्टरांचें बोर्ड:**—कंपन्यांच्या डायरेक्टरांचे बोर्डावर खालीलप्रमाणें स्पेशल डायरेक्टर निवडण्यांत यावे.

( १ ) एकेक शेअर असणाऱ्या शेअर होल्डर्सतर्फे एक स्पेशल डायरेक्टर निवडण्यांत यावा व त्याची निवडणूक, "पत्रिका" पाठवून, रजिस्ट्रारचे देखरेखेखालीं व्हावी. त्यासाठीं मध्यवर्ती सरकारनें कंपनी कायदा दुरुस्तीचे वेळीं नियम करावेत. या कामासाठीं रजिस्ट्रारला ५० रुपये किंवा योग्य फी द्यावी.

ही सूचना मान्य केली गेल्यास खालील फायदे होतील. एकेक शेअर असणाऱ्या शेअर होल्डरांमध्यें एक तऱ्हेची नैराश्यवृत्ति उत्पन्न झालेली असते कीं आपणास कांहीं करतां येत नाहीं, ती कमी होईल; त्यांच्यांत कंपनीचे कामकाजासाठीं आस्था निर्माण होईल व कंपनीचे कारभारांत त्यांना एक स्थान निर्माण होईल. शिवाय एजन्टसना यांत फारशी ढवळाढवळ करतां येणार नाहीं. अशा रीतीनें निवडून येणारा डायरेक्टर थोडाफार "स्वतंत्र" असल्यामुळें त्याचा कंपनीचे कारभारावर थोडा जास्त वचक राहील. अशा डायरेक्टरला, "क्वॉलीफिकेशन" शेअरची अट असूं नये व त्यास इतर डायरेक्टर्सप्रमाणें सर्व अधिकार, मान व सत्ता असावी. ही निवडणूक दर दोन किंवा तीन वर्षांनी व्हावी. यामुळें एकच शेअर असला तरी त्याचें महत्त्व तो असणाराला वाटूं लागेल.

( २ ) **मजुरांचा किंवा कामगारांचा डायरेक्टर:**—ज्या कंपन्या कारखाने चालवितात त्यासाठीं दिल्लीचे प्रसिद्ध गिरणीमालक सर लाला श्रीराम यांनी कित्येक वर्षांमागें आपल्या कंपनीच्या बोर्डावर आपल्या कामगारांमधील एकास डायरेक्टर बोर्डावर घेतलें होतें. तेव्हां ही नवी व अशक्य कल्पना नाहीं. असा एक डायरेक्टर, स्पेशल किंवा एक्स्ट्रा, कायद्यानेंच निवडला जावा. ज्या कारखान्यांत पांचशे कामगार असतील असा कारखाना चालविणाऱ्या कंपनींत असा एक डायरेक्टर घेतलाच पाहिजे. ५०० पेक्षा कमी कामगार असणाऱ्या कारखान्यांत "पाहिजे तर" असा डायरेक्टर निवडावा. या संबंधीचे नियम मध्यवर्ती सरकारनें करावे व "लेबर डिपार्टमेंट"नें निवडणुकीची व्यवस्था पहावी. अशा डायरेक्टरला "क्वालिफिकेशन" शेअर्सची अट असूं नये व त्याचा दर्जा, मान व अधिकार इतर डायरेक्टरांप्रमाणेंच असावेत. निवडणूक दर दोन वा तीन वर्षांनीं व्हावी. एका कामगारास फक्त दोनदांच निवडून येतां यावे, वगैरे नियमांत घालता येतील.

असा कामगारांनीं निवडून दिलेला डायरेक्टर कंपनीचा कारभार, त्यांत येणाऱ्या अडचणी, वगैरे समजूं शकेल व त्याच परिणाम मालक-मजूर यांचे संबंधावर दूरवर व खोलवर होईल. यामुळें एकोप्याचा एक दुवा सांधला जाईल व पुष्कळसे संघर्षही टळतील. मजुरांना वा कामगारांनाही वाटूं लागेल कीं कंपनीचे कारखान्यांत आपलाही एक कारभारी ( डायरेक्टर ) आहे व त्यामुळें एक आपलेपणा उत्पन्न होईल.

**दैनंदिन कारभारावर बंधनें:**—सध्याचे कायद्यांत वा २३ सूचनांमध्यें दैनंदिन कारभारासंबंधीं सूचना वा नियम नाहींत. उत्तम रीतीनें चालविल्या जाणाऱ्या कंपन्या कांहीं विशिष्ट पद्धती अनुसरतात. पण पुष्कळ कंपन्यांतून अनागोंदी कारभार एजन्टस करतात. म्हणूनच कायद्यानें खालील बंधनें घातलीं जावींत. कायद्यानें हस्तक्षेप शक्य तितका थोडा असावा असें लेखकाचें मत आहे. परंतु सध्याचे परिस्थितींत पुष्कळश्या कंपन्यांचे एजन्टस् मन मानेल तसे कारभार करतात, म्हणूनच खालील बंधनें, निव्वळ कारभार व्यवस्थेशीर चालावा म्हणून व त्यायोगें शेअरहोल्डर्सचे जास्तींत जास्त हित व्हावें म्हणून कायद्यानेंच घातलीं जावींत.

१ बोर्डाची सभा— दर महिन्याचे तिसऱ्या आठवड्यांत घेतली पाहिजे. ( २ ) या सभेंत खालील पत्रकें एजन्टस वा मॅनेजिंग डायरेक्टर वा मॅनेजर यांनी मांडली पाहिजेत. ( अ ) सभा भरणाऱ्या महिन्याच्या अगोदरच्या महिन्याच्या कारभाराचा वृत्तांत, ( ब ) नफा-तोटा-पत्रक ( शक्य तितकें बरोबर असें, ) ( क ) खरेदी विक्रीचा ठोकळ तपशील, ( ड ) अंदाजपत्रक वा अंदाजाशी व्यवहाराची तुलना, ( ई ) ठेवी, कर्जें, देणी व घेणी यांचा तपशील, ( फ ) फॉरवर्ड सौदे असल्यास त्याची माहिती व मंजुरी, ( ज ) त्याच धंद्यांतील इतर कंपन्यांचे कारभारासंबंधीची शक्य असेल ती माहिती बोर्डापुढें ठेवावी.

मुंबईतील कार्यक्षम व चांगल्या पद्धतीनें चालणाऱ्या कंपन्या सध्या ही वरील सूचना अंमलांत आणतातच. त्यांत अवघड व अडचणीचें कांहीं नाहीं. उलट दैनंदिन कारभाराला एक व्यवस्थित स्वरूप येतें व व्यवस्था पुस्तकें वगैरे "अपटुडेट" ठेवलीं जातात. यांत नवीन असें कांहीं नाहीं. प्रस्तुत लेखकाला कांहीं कंपन्या अशा आढळल्या कीं ८-९ महिने डायरेक्टरांच्या सभा नाहींत. अशा कंपन्यांत डायरेक्टर काय "डायरेक्ट" करतात परमेश्वर जाणे. कोठेंतरी नादुरुस्त भाग असतो त्यावेळींच एजन्टस वा मॅनेजिंग डायरेक्टर अशी चालढकल करतात. तसें होऊं नये व जनतेचें भांडवल गोळा करणाऱ्या कंपन्यांना—ज्या वरील बंधनें पाळीत नाहींत त्यांना—कायद्यानेंच हीं बंधनें घालावीं व त्यांचा कारभार कार्यक्षम व त्यामुळें "सर्वांच्या" हिताचा व्हावा ही कल्पना. या योगें डायरेक्टर्सवरील जबाबदारी त्यांना पार पाडण्यास फार मदत होईल. यांत कायद्याच असला म्हणजे विश्वास-अविश्वास या भानगडी उत्पन्न होणार नाहींत.

(२) डायरेक्टरांनीं दूर तिमाहींत एकदा तरी कारखान्यास भेट दिली पाहिजे.

(३) ही सूचना जरा नवी आहे. डायरेक्टर्सवर कंपनीचे कारखान्यास भेट देण्याची सक्ती नाहीं. ती व्हावी व त्यामुळें डायरेक्टर्स व मजूर, कामगार व ऑफीसर्स यांची तोंडओळख तरी होईल. मजुरांना आपले डायरेक्टर्स दिसतील. एजन्टसना ही सूचना नावडणारी आहे. सध्याचें पद्धतीमुळें त्यांना मनसोक्त स्वातंत्र्य असतें. या सूचनेमुळें त्यांना थोडें फार जपून व व्यवस्थित वागावें लागेल व चांगला कारखाना चालण्यास तें अवश्य आहे. "सरप्राइज" व्हिजिट असावी. म्हणजे त्याचा कारखान्याचे व्यवस्थेवर फार उत्तम परिणाम होईल. "सरळ" व्यवहार, व टापटिपीची आदर्श व्यवस्था आचरणांत येण्यास अशा भेटीची फार मदत होईल, हें दूरवर विचार केल्यास पटेल. "उत्तम" व्यवस्था राखली गेल्यास एजन्टस वा मॅनेजिंग डायरेक्टर यांचा भाव, "प्रेस्टीज", वाढेल; उतरणार नाहीं.

(४) डायरेक्टर्सना सभेच्या ठराविक "फी" शिवाय व त्यांचे शेअर्सवरील व्याजाशिवाय एक पैही घेतां येऊं नये. प्रवासभत्ता व प्रवासखर्च वगैरे सुद्धां त्यांचा त्यांनी करावा. डायरेक्टर वकील असल्यास त्यास पैसे घेऊन सल्ला देण्याचा वा कंपनीचे खटले चालविण्याचा अधिकार नसावा. कायद्याचा सल्ला देण्यासाठीं सॉलिसिटर असतोच, व पुष्कळ कंपन्या त्याचें नांवही आढाव्यावर छापतात. मग आणखी डायरेक्टरमध्यें वकील सल्लागार कशाला ? बरें, असा सल्ला घ्यावयाचा झाला व कांहीं कज्जे खटले-असले तर त्यासाठीं बोर्डाच्या बाहेरचा वकील नेमावा. यामुळें कंपनीचीं कामें "चोख" चालतात. हें पहाणें इतर डायरेक्टर्सना व वकील डायरेक्टरांनाही सोपें जाईल. भिडेस जागा राहणार नाहीं.

(५) जेथें खालील व्यवहार असेल तर तो नसावा डायरेक्टरचे "क्वालिफिकेशन" शेअर्स त्याचे त्यानेंच खरेदी केलेले असावेत. एजन्टस किंवा मॅनेजिंग डायरेक्टर यांनीं नांवावर चढवून, ब्लँक ट्रॅन्स्फर घेतलेले नसावेत व असे ब्लँक ट्रॅन्स्फरवर असल्यास कायद्यानें त्यास प्रतिबंध असावा व डायरेक्टरचे नांवावर कंपनीचे बुकांत असलेले शेअर्सबद्दल ब्लँक ट्रॅन्स्फर केलेले नाहींत असें प्रतिज्ञापत्रक घेतलें जावें. शेअरहोल्डर्सचे हिताचे दृष्टीनें हें जरूर आहे.

ज्याला सरळ व्यवहार करावयाचा नाहीं, त्यास कायद्यांत पळवाटा सांपडतात वा दाखविल्या जातात. सध्याचा कायदा सुधारला तरी त्या सांपडतील. मुख्य कंपनी चालविणारे व त्यावर देखरेख करणारे डायरेक्टर हे सरळ व योग्य मार्गानें व कंपनीचे भागीदारांचे भाग ही एक आपले जवळ "ठेव" आहे व ती आपण "सुरक्षित" ठेवलीच पाहिजे या भावनेनें काम करतील तरच सुधारणा केल्याचा उपयोग; नाहीं तर सुधारणा कागदावरच रहावयाची. डायरेक्टर्सनी परमेश्वरसाक्ष कामकाज केल्यासच महाराष्ट्राची, लहान लहान कंपन्यांमार्फत औद्योगिक प्रगति व भरभराट होणारी आहे. अशी बुद्धि सतत जागृत राहिल्यासच जनतेचा व स्मॉल इन्व्हेस्टर्सचा (एकेक शेअर घेणाऱ्यांचा) विश्वास मिळेल व जरूर तें भांडवल, परिस्थिति सुधारेल त्याप्रमाणें पुढें येईल तें संभाळण्याचें व वृद्धिंगत करण्याचें कर्तव्य डायरेक्टरांचें. तें ते पार पाडोत ही प्रार्थना.

---


## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

स्थापना १९३६

## युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा

पॅलेस स्ट्रीट, सातारा.

शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नाशिक व बार्शी.

ता. ३१-१२-४८ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ५,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स | रु. | १,३१,००० |
| ठेवी | रु. | ७९,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ८९,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्षे | तीन अगर अधिक वर्षे |
|---|---|---|
| रु. १-८-० | रु. १-१२-० | ३ रुपये |

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १-८-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | " | १-०-० |
| चालू डिपॉझिट | " | ०-८-० |

सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.
वा. ग. चिरमुले, बी. ए., एलएल्. बी., चेअरमन

## सी. पी. अँड बेरार (मध्यप्रदेश) प्रोव्हिन्शल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, नागपूर.

स्थापनाः—१९१२.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | २०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | रु. | १०,१४,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड | रु. | ११,१६,००० |
| खेळतें भांडवल | रु. | १,४९,६४,००० |

अध्यक्षः— सर माधवराव देशपांडे, के. बी. ई.

बँकिंगचे सर्व व्यवहार होतात.

बँकेचे शेअर्सची विक्री चालूं आहे. गेल्या ४ वर्षांची मुनाफा वांटणी पांच दरानें केली.

सरकारची पूर्ण हमी असलेले शेंकडा तीन व्याजाच्या दराचे रोख्यांची विक्री चालूं आहे. रोख्यांची मुदत १० व १५ वर्षांनीं भरेल.

विमा कंपन्या, बँका, म्युनिसिपालिट्या, शाळा, जमीनदार वगैरेंनीं वरील रोखे जरूर खरेदी करावेत.

गो. आ. भोंसुले,
मॅनेजर.

### दि बँक ऑफ कराड, लि.

वरील बँकेच्या ताज्या ताळेबंदांतील प्रमुख आकडे खालील-प्रमाणें आहेत:—

| | रु. | | रु. |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | २,०८,६२५ | रोकड व बँकांत ठेवी | ५,०४,३९१ |
| फंड्स | १८,००० | बिल्स | २,२१,७९१ |
| ठेवी | १६,२५,१५१ | इनव्हेस्टमेंटस | ५,१४,९२८ |
| नफा | २४,६०८ | कर्जे | ९,४८,७२६ |

वरील आकड्यांवरून बँकेच्या प्रगतीची कल्पना येईल. व्याज व डिस्कौंटचे बँकेस ८२,०२५ रु. मिळाले व बँकेनें ४१,१२० रु. व्याज दिलें. नफ्यांतून ५,००० रुपये रिझर्व्ह फंडांत टाकून, १,००० रुपये सिक्युरिटीज फ्लक्चुएशन रिझर्व्हमध्यें घालून व ९,००० रुपयांची कराची तरतूद करून ४% करमाफ डिव्हिडंड देण्यासाठीं ८,४०० रुपये लागतील. बँकिंग कंपनी कायद्यामुळें एकाच गृहस्थास दोन बँकांत डायरेक्टर रहातां येत नसल्यानें श्री. द्वारकादास हरिदास वखारिया, जे. पी., ह्यांना कराड बँकेंतून निवृत्त व्हावें लागलें. त्याचप्रमाणें, श्री. विष्णुपंत शिराळकरांनीं मॅनेजिंग डायरेक्टरचा कायद्याप्रमाणें राजीनामा दिला. ह्या दोघांच्याहि बहुमोल सेवेचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख बोर्डानें आपल्या अहवालांत केला आहे. ( चेअरमनः श्री. ल. म. देशपांडे, लँडलॉर्ड, कराड. मॅनेजरः श्री. म. वि. खंडकर.)

### दि भोर स्टेट बँक लि., भोर

अहवालाचे वर्षीं वरील बँकेस तिच्या व्यवहारांत १३,०२० रु. नफा झाला. रिझर्व्ह फंडांत २,६०० रुपये टाकले म्हणजे तो फंड आतां ३७,१४७ रुपये होईल. इनव्हेस्टमेंट रिझर्व्ह फंड २९,३८० रु. असून इ. फ्लक्चुएशन रिझर्व्ह ३,५२४ रु. आहे. वसूल भांडवल २,५०,००० रु. आहे. ठेवींची रकम भोर संस्थान मुंबई प्रांतांत विलीन झाल्यामुळें कमी झाली तरी ती सुमारे १० लक्ष रुपये आहे आणि तिचेशी बँकेच्या स्वतःच्या भांडवलाचें प्रमाण अत्यंत चांगलें आहे. इनकमटॅक्सचा कायदा भोर संस्थानास लागू झाल्यामुळें चालू वर्षाकरितां करासाठी २ हजारांची तरतूद नफ्यांतून करून ठेवली आहे. बँकेच्या सर्व शाखा नफ्यांत आहेत. ( चेअरमनः श्री. म. त्र्यं. शिंगरे. मॅनेजर; श्री. रा. गो. आगाशे, बी. ए. )

### सातारा जिल्हा को. लँड मॉर्गेज बँकेची सांगली शाखा

मुंबई प्रांतांत लॉंग मुदतीनें कर्ज देणाऱ्या लँड मॉर्गेज बँका बऱ्याच जिल्ह्यांत आहेत. यांतील ज्या कांहीं बँका चांगल्या प्रकारें चालल्या आहेत, त्यापैकींच वरील बँक प्रमुख आहे. तारीख १५-३-५० रोजीं दक्षिण सातारा जिल्ह्याकरितां सांगली येथें शाखा कचेरी उघडण्याचा समारंभ कलेक्टर श्री. चिन्मुलगुंद यांचे हस्तें सायंकाळीं ५॥ वाजतां वखार भागांत करण्यांत आला. समारंभास निमंत्रित पाहुणे, सेंट्रल बँकेचा अधिकारी वर्ग, जज्ज श्री. शिखरे वगैरे मंडळी हजर असून, नामदार नाईक निंबाळकर, श्री. यशवंतराव चव्हाण, श्री. नगीनदास मास्तर, श्री. वा. बु वर्दे, ओगले ग्लासचे जनरल मॅनेजर श्री. पाध्ये वगैरे मंडळींचे संदेश आले होते.

### पुणें सें. को. बँकेची भोर शाखा

पुणें सें. को. बँकेच्या भोर शाखेचा उद्घाटन समारंभ रा. ब. गणेश गोपाळ शेवेकर ह्यांच्या हस्तें रविवार, ता. १९ रोजीं वर्षप्रतिपदेचे सुमुहूर्तावर झाला.

### पूना मर्चंट्स को. बँक लि.

दरवर्षीप्रमाणें यंदाचे वर्षींहि ह्या बँकेमें वर्षप्रतिपदेचे निमित्तानें बँकेच्या सभासदांस व खातेदारांस पानसुपारीस निमंत्रण दिलें होतें, त्याप्रमाणें सुमारें ३५० जणांनीं त्याचा स्वीकार केला. बँकेचे चेअरमन श्री. ग. म. नळवडे, डायरेक्टर श्री. द. वा. पोतदार, इत्यादि सर्वांचें स्वागत करीत होते.

**कापडाची निर्यात**—निर्यात सल्लागार समितीची बैठक मुंबईला नुकतीच भरली होती. समितीनें सप्टेंबर १९५० अखेर १५ कोटी वार कापडाची निर्यात करण्यास परवानगी देण्याचें ठरविलें आहे. ह्या पूर्वी ८० कोटी वारांच्या निर्यातीस परवानगी दिलेलीच आहे. जुलै १९४९ ते जानेवारी १९५० पर्यंत ४१·५ कोटी वार कापड निर्यात करण्यांत आलें. ह्या वर्षाच्या जून अखेरपर्यंत आणखी ४५ कोटी वार कापड निर्यात करण्यांत येईल असा अंदाज आहे. ह्यापैकी १० कोटी वार कापडाच्या निर्यातीला परवानगी मागणारे अर्ज अद्याप दप्तरीं पडून आहेत.

**मॅट्रिकचे खोटे दाखले**—कराची येथील पोलिसांनीं मॅट्रिकच्या परीक्षेंतून उत्तीर्ण झाल्याचे खोटे दाखले देणाऱ्या एका टोळीला अटक केली आहे. ह्या खोट्या सर्टिफिकेटांचा भाव प्रत्येकीं ४० रुपये ठरविण्यांत आला होता. सुमारें ५०० विद्यार्थ्यांनीं तरी ह्या 'संधीचा' फायदा घेतला असावा. टोळीच्या जागेवर छापा घातला त्यावेळीं तेथें पंजाब विद्यापीठाची निशाणी असलेले व व्हॉइस चॅन्सेलरची सही असलेले असे कोरे दाखले सांपडले.


शेतकरी बांधवांकरतां लॉंग मुदतीनें कर्ज देण्याची सोय

**सातारा जिल्हा को. लँड मॉर्गेज बँक लि.**

मुख्य ऑफीस: कराड

शाखाः—सांगली

जुनें कर्ज भागविणें, जमीन खरेदी करणें, विहीर काढणें व दुरुस्त करणें, शेती उपयोगी यंत्रें खरेदी करणें इ. कारणाकरितां योग्य तारणावर कर्जें दिलीं जातात. व्याजाचे दरः—

जमीन खरेदी व जुनें कर्ज भागविणे—६ टक्के जमीन सुधारणे—३½ टक्के.

यंत्र सामुग्री खरेदी करणें करता ५॥ टक्के.

कर्जाची फेड ५ वर्षांपासून २० वर्षेपर्यंत सारख्या हप्त्यानें करतां येते.    चेअरमन



दि डेकन मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनच्या विद्यमानें

**"दख्खन दौलत"**

औद्योगिक प्रदर्शन कोल्हापूर

२३ एप्रिल १९५० ते ५ मे १९५०

स्टॉल्स व अधिक माहितीसाठी लिहा.

ऑ. सेक्रेटरी, दख्खन दौलत प्रदर्शन

सुभाषरोड, लक्ष्मीपुरी, कोल्हापूर

( भारत पब्लिसिटी )

## १९४९--५० मधील सांगली सहकारी सेक्रेटरी शिक्षण वर्गाच्या परिक्षेचा निकाल

सदर वर्ग सातारा जि. को. बोर्डाच्या विद्यमानें सांगली येथें ता. १० नोव्हेंबर १९४९ ते ३१ डिसेंबर ४९ अखेर मुदतीचा भरविण्यांत आला होता. या क्लासचा फायदा दक्षिण सातारा जिल्ह्यांतील निरनिराळ्या तालुक्यांतील ६० विद्यार्थ्यांनीं घेतला. क्लासची परिक्षा ता. १।१।१९५० त ३।१।१९५० पर्यंत घेण्यांत आली. परिक्षेस एकूण ६० विद्यार्थी बसले होते. त्यापैकीं ५४ विद्यार्थी परिक्षेंत खालीं दर्शविल्याप्रमाणें उत्तीर्ण झाले आहेत. निकालाचें प्रमाण शेंकडा ९० टक्के आहे.

गुणानुक्रमें वर्ग १ लाः--१ आ. न. बिरनाळे, २ वा. के. पटवर्धन, ३ रा. ब. शिंदे, ४ स. ह. चव्हाण, ५ रं. आ. पाटील, ६ मु. दे. उपाध्ये, ७ पं. तु. पवार, ८ ज. मा. तेली, ९ सु. शां. फडणीस, १० रा. मि. पाटील, ११ शि. अ. पाटील.

वर्ग २ राः--१ ना. ने. सकळे, २ मा. गो. पाटील, ३ पां. धों. शिंदे, ४ म. खा. मोरे, ५ ब. ना. दुकानदार, ६ आ. शि. दुगाणे, ७ म. ब. गढदे, ८ रा. दा. जगताप, ९ कुं. तु. फळके, १० शं. कृ. कोरपे, ११ ल. अ. माळी, १२ आ. का. मोहिते, १३ म. अ. पाटील, १४ धों. दा. पाटील, १५ द. रा. शेटे, १६ द. खं. दळवे, १७ बा. व. सूर्यवंशी, १८ सा. दा. शेटे, १९ आ. पा. वंजाळे, २० ल. ज. चव्हाण.

वर्ग ३ राः--१ ग. कृ. पाटील, २ साहेब हजरत अबदुल राहिम पिरजादे, ३ न. गो. जोशी, ४ य. व. जगताप, ५ हिं. रा. खराडे, ६ वि. दा. मोहिते, ७ शा. वा. मोरे, ८ तु. पां. नलावडे, ९ ह. के. झुरे, १० रा. भा. भेंडवडे, ११ शा. पा. जाधव, १२ बा. पां. पटवर्धन, १३ य. प. पाटील, १४ य. वि. पाटील, १५ सय्यद अहमद सिलेमान, १६ बा. जी. ऐतवडे, १७ दा. ना. खोत, १८ रा. शं. माळी, १९ रा. ह. बोरगांवकर, २० शि. कुं. खांडेकर, २१ बा. म. बेंडुगडे, २२ बा. ग. कुलकर्णी, २३ ग. रा. जाधव.

बी. डी. निकम,
को. ट्रे. इन्स्पेक्टर सातारा.

### ईस्टर्न शिपिंग कॉर्पोरेशनची स्थापना


सरकार पुरस्कृत शिपिंग कॉर्पोरेशनच्या व्यवस्थेसंबंधीं भारत सरकारनें सिंदिया स्टीम नॅव्हिगेशन कंपनी लिमिटेडशीं चालविलेल्या वाटाघाटी आतां पूर्ण झाल्या असून भारत सरकार आणि सिंदिया कंपनी यांमध्यें त्याबाबतचे आवश्यक ते करारही झाले आहेत. सदरहू शिपिंग कॉर्पोरेशन 'ईस्टर्न शिपिंग कॉर्पोरेशन' या नांवानें ओळखली जाईल. या कॉर्पोरेशनची मुंबईत पुढील कांहीं दिवसांत नोंदणी करण्यांत येऊन त्याच्या कामकाजास सुरवात होईल अशी अपेक्षा आहे. या कॉर्पोरेशनचें अधिकृत भांडवल १० कोटी रुपयांचें राहील. त्यांतील ७४ टक्के सरकारकडून मिळेल व बाकीचें २६ टक्के व्यवस्थापक जमवितील. विक्रीस काढलेलें भांडवल सध्यां दोन कोटी रुपयांचेंच राहील. श्री. सी. एच. भाभा हे या कॉर्पोरेशनच्या बोर्ड ऑफ डायरेक्टर्सचे अध्यक्ष म्हणून काम पाहातील. यांशिवाय यामध्यें ६ सरकारी व ३ सिंदिया कंपनीचे डायरेक्टर असतील.

**गोपाळराव चौकशी कमिटीचा अहवाल**---कांहीं वर्षांपूर्वी बंगलोर येथील एका बँकेंतील गोपाळराव नांवाच्या कारकुनानें लोकांपासून जबर व्याजानें ठेवी घेण्याचा 'धंदा' सुरू केला होता. परंतु कांहीं ठेवीदारांनीं आपल्या ठेवी एकदम परत मागितल्यामुळें आणि इतर कारणांमुळें त्याचा 'व्यवसाय' बसला. ह्या सर्व प्रकरणाची चौकशी करण्यासाठी म्हैसूर सरकारनें एक कमिटी नेमली होती. ह्या कमिटीनें दोन वर्षें चौकशी केली, ६०० साक्षिदारांच्या साक्षी घेतल्या आणि १,२०० खात्यांची तपासणी केली. कमिटीनें ४२ लाख रुपये वसूल केले आणि ठेवीदारांना रुपयांत ६ आणे परत दिले.

**तेलाच्या संशोधनासाठी खर्च**---लंडन येथील रॉयल डच शेल ह्या गटांतील कंपन्यांनीं १९५० सालांत तेलाच्या संशोधनासाठी ६५,००,००० पौंड रक्कम खर्च करण्याचें ठरविलें आहे. ह्या कंपन्यांच्या ब्रिटन, हॉलंड आणि अमेरिका येथें बऱ्याच प्रयोगशाळा आहेत. तेलापासून नवीन काय पदार्थ तयार करतां येतील, भूमिगत तेलाचा शोध कसा करावा, इत्यादि अनेक बाबतींत वरील प्रयोगशाळांतून सध्या संशोधन चालू आहे.

**साखरेचें उत्पादन वाढलें**---गेल्या नोव्हेंबरच्या एक तारखेपासून भारतांतील साखरेचें उत्पादन ह्याच कालांतील गेल्या वर्षाच्या उत्पादनापेक्षा ३० लाख मणांनीं वाढलें आहे.

बेडेकर मसाले वापरा




हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गानिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.